# पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२

ई-मेल :panvelcorporation@gmail.com वेबसाईट:www.panvelcorporation.com


दि.२७/०३/२०२४

## निवड उमेदवारांकरीता सूचना

पनवेल महानगरपालिका सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत माहे डिसेंबर २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रम, प्रवर्गनिहाय, सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवड सूचीतील निवड यादीत नमूद असलेल्या उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात सादर केलेली माहिती व दस्ताऐवजाची पडताळणी करण्यात आली आहे.

दस्ताऐवज पडताळणीअंती पात्र उमेदवारांना निवड पत्र देण्यात आले असून वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेबाबत पत्र देण्यात आले आहे.वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र दि.१५/०३/२०२३ रोजी वा त्यापुर्वी सादर करणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. सदर नियुक्ती आदेशात सेवेत रुजु होण्याचा कालावधी दि.०१/०३/२०२४ ते दि.३०/०३/२०२४ असा देण्यात आला आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची आदर्श आचारसहिंता दि.१६/०३/२०२४ रोजी पासुन लागु झाली असल्याने नियुक्ती आदेश दिलेल्या तथापी सेवेत रुजू न झालेल्या उमेदवारांना सेवेत रुजू करुन घेता आले नाही.

नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना सेवेत रुजू करुन घेणेस परवानगी मिळणेबाबत शासनास विनंती करण्यात आली आहे. शासनाकडुन याबाबत परवानगी प्राप्त होताच उमेदवारांस सेवेत रुजू होणेबाबत त्यांचे वैयक्तीक ई-मेल आयडी वर कळविण्यात येईल. अन्यथा आदर्श आचारसहिंता संपुष्टात आल्याचे तारखेपासुन म्हणजेच दि.०६/०६/२०२४ रोजी पासुन उमेदवारांस सेवेत रुजू होता येईल. सेवेत रुजू होण्याचा अंतिम दिनांक १५/०६/२०२४ असा राहिल.

सेवेत रुजू होण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.२१/०६/२०२१ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ मधील तरतूदीनुसार सेवा ज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

**तरी सर्व निवड उमेदवारांना सुचित करण्यात येते की, वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र त्वरीत या कार्यालयास सादर करावे**

**मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने**

**(कैलास गावडे)**
**उप आयुक्त (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**